## संक्षिप्त

### चिलिका सरोवरला बर्ड फ्लूचा वेढा

**भुवनेश्वर :** ओडिशातील चिलिका सरोवर परिसरात बर्ड फ्लूचा संसर्ग झाल्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. येथे काही दिवसांपूर्वी कावळे मृतावस्थेत आढळल्याने बर्ड फ्लूचा संशय बळावला आहे. याच्या तपासासाठी केंद्रपाडा जिल्हा प्रशासनाने स्थलांतरित पक्षी आणि भीतरकनिका राष्ट्रीय उद्यान व परिसरात असलेल्या कुक्कुटपालन केंद्रातील पक्ष्यांच्या विष्ठेचे व रक्ताचे नमुने गोळा करण्यास सुरवात केली आहे. चिलिका सरोवराचा परिसर बर्ड फ्लूग्रस्त असल्याचे राज्य सरकारने जाहीर केल्यानंतर दुसऱ्या दिवसापासून परिसरातील सनसाही, मालुदा, अलंदा आदी गावांमधील कोंबड्या मारण्यास सुरवात झाली आहे. कुक्कुटपालन केंद्रातील पक्षी व कावळ्यांच्या नमुन्यात ‘एच५एन१’’ विषाणू आढळल्यानंतर पक्ष्यांना मारण्याचा आदेश राज्य सरकारने दिला असून, १८ डिसेंबरपर्यंत एक हजार पाळीव पक्षी मारण्यात आल्याचे ओडिशाच्या मत्स्य उद्योग व पशुधन विकास विभागाचे सचिव विशाल गगन यांनी सांगितले.

### खाणीतील स्फोटात १३ कामगार ठार

**प्राग, झेक प्रजासत्ताक :** झेक रिपब्लिकच्या पूर्वेकडील कार्विना शहरातील कोळशाच्या खाणीत मिथेन वायूचा स्फोट झाल्याने १३ कामगार ठार झाले तर १० जखमी झाले. ‘ओकेडी’’ या खाण कंपनीचे प्रवक्ते इव्हो सेलेशोव्हस्की यांनी दिली. मृतांमध्ये ११ पोलंडचे व दोन झेक कामगारांचा समावेश आहे.

### महाआघाडीमुळे भाजप अस्वस्थ

**लखनौ :** आगामी सार्वत्रिक निवडणुकीसाठी उत्तर प्रदेशात भाजपविरोधी पक्षांची महाआघाडी आकाराला येण्याची शक्यता वर्तविली जात असून, समाजवादी पक्ष(सप), बहुजन समाज पक्ष (बसप) आणि काँग्रेस हे तिन्ही पक्ष एकत्र आले तर भाजपचे पानिपत निश्चित असल्याचे राजकीय जाणकारांचे म्हणणे आहे. संभाव्य महाआघाडीच्या स्थापनेच्या चर्चेमुळे सध्या भाजपच्या गोटात चिंतेचे वातावरण आहे.

### अमेरिकेचे संरक्षणमंत्री मॅटिस यांचा राजीनामा

**वॉशिंग्टन :** अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा सीरियातून अमेरिकी सैन्य माघारी बोलाविण्याच्या निर्णयाला मित्रदेशांबरोबरच मंत्रिमंडळातूनही विरोध होत असतानाच संरक्षणमंत्री जेम्स मॅटिस यांनी थेट राजीनामाच दिल्याने ट्रम्प प्रशासनाला धक्का बसला आहे. तसेच, ट्रम्प यांचे वरिष्ठ अधिकारी आणि मंत्र्यांचे राजीनामा देण्याचे सत्रही यामुळे कायम राहिले आहे.

# गुजरातमध्ये थकीत वीजबिल माफ

## राज्यातील सव्वासहा लाख शेतकऱ्यांना मिळणार लाभ

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था):** मध्य प्रदेश, राजस्थान आणि छत्तीसगडमध्ये नुकतीच सत्ता स्थापन करून काँग्रेसने शेतकरी योजनांचा धडाका लावला आहे. आता भाजप शासित गुजरात सरकारने शेतकऱ्यांचं प्रलंबित ६२५ कोटींचं वीजबिल माफ केलं आहे. या निर्णयाचा लाभ राज्यातील ६.२२ लाख शेतकऱ्यांना होणार आहे. त्यामुळे आता महाराष्ट्रासारख्या इतर भाजपशासित राज्यांमधूनही वीजबिल माफ करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

मध्य प्रदेश, राजस्थान आणि छत्तीसगडमध्ये सरकार स्थापन झाल्यानंतर काँग्रेसच्या नवनियुक्त मुख्यमंत्र्यांनी आपल्या राज्यांमध्ये कर्जमाफीची घोषणा केली. तर मध्य प्रदेश सरकारने महत्त्वकांक्षी अशा शेतकरी पेन्शन योजनेचीही घोषणा केली. त्यामुळे भाजपचे सरकार असलेल्या गुजरातमध्येही शेतकऱ्यांसाठी वीजबिल माफीची महत्त्वपूर्ण घोषणा करण्यात आली आहे.

गुजरातचे ऊर्जामंत्री सौरभ पटेल म्हणाले, की या निर्णयाचा ६.२२ लाख शेतकऱ्यांना फायदा होणार आहे. प्रामुख्याने ग्रामीण भागातील जनतेला या योजनेचा लाभ होणार आहे. यामध्ये घरगुती ग्राहक, व्यापारी संकुले आणि शेतकरी यांचा समावेश आहे. आयपीसी कलम १२४ आणि १३५ अंतर्गत



### शेतकऱ्यांना दिलासा

- थकीत ६२५ कोटी वीजबिल माफ होणार
- राज्यातील ६.२२ लाख शेतकऱ्यांना फायदा
- घरगुती ग्राहक, व्यापारी संकुले आणि शेतकरी यांचा समावेश
- जप्त केलेले कनेक्शन ५०० रु. भरून परत मिळणार

वीज चोरी आणि विजेचं बिल थकवल्यामुळे ज्यांची वीज कापण्यात आली होती, त्यांचे कनेक्शन ५०० रुपये शुल्क देऊन परत मिळवता येतील. याचा फायदा शेती आणि व्यावसायिकांना होईल. २० डिसेंबरला गुजरातमध्ये जसदन पोटनिवडणुकी मतदान झाले. ही जागा सौराष्ट्रमधील अतिशय प्रतिष्ठेची होती. त्यासाठी भाजपने मत मिळवण्यासाठी ही युक्ती वापरल्याचं म्हटलं जात आहे. तर काँग्रेसने भाजपच्या या निर्णयावर टीका केली आहे. मध्यप्रदेशचं कमलनाथ सरकार शेतकऱ्यांचे कर्ज माफ करू शकते, तर गुजरातचं रुपानी सरकार हे का करू शकत नाही? असा सवाल काँग्रेस प्रवक्ते मनीष दोशी यांनी उपस्थित केला आहे.

### महाराष्ट्रातूनही वीजबिल माफीची मागणी

गुजरात सरकारने राज्यातील शेतकऱ्यांचे थकीत वीजबिल माफ केले आणि शेतकऱ्यांना दिलासा दिला. आता इतर भाजपशासित राज्यांमधील शेतकरीही वीजबिल माफीची मागणी करत आहेत. महाराष्ट्रातही कृषी वीजबिल कोटींच्या घरात थकलेलं आहे. त्यामुळे फडणवीस सरकार गुजरात सरकारच्या पावलावर पाऊल कधी टाकणार याकडे शेतकऱ्यांचं लक्ष लागलं आहे.




**दिल्लीः सीआयआय- इंडस्ट्रियल इनोव्हेशन ॲवॉर्ड २०१८ स्वीकारताना ॲग्झॉन ॲग्रोचे सहसंस्थापक आणि चीफ कमर्शियल ऑफिसर विशल रतन.**

# ॲग्झॉन ॲग्रोला यंदाचा इंडस्ट्रियल इनोव्हेशन ॲवॉर्ड

**पुणे :** सर्वोत्कृष्ट २५ कंपन्यांना त्यांच्या नावीन्यपूर्ण उत्पादनांसाठी आणि सेवांसाठी पुरस्कृत केले जाते. कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्री(सीआयआय)च्या इंडस्ट्रियल इनोव्हेशन ॲवॉर्डने गेल्या ४ वर्षात स्वत:ला भारतात सर्वात प्रतिष्ठित नवकल्पना पुरस्कार म्हणून प्रतिष्ठापित केले आहे. हा पुरस्कार त्या कंपन्यांना दिला जातो जो नवकल्पना, संशोधन आणि विकास यामध्ये उत्कृष्ट आहेत.

ॲग्झॉन ॲग्रोने ICHOR आणि PRO-ESSEN तंत्रज्ञानाचा परिचय करून नवकल्पना दर्शविली आहे. ICHOR तंत्रज्ञान प्रो बायोटिक यंत्रणाद्वारे एमिनो ॲसिडचे संश्लेषण करण्यासाठी एक विशिष्ट तंत्रज्ञान आहे. PRO ESSEN हे अशा प्रकारचे पहिले तंत्रज्ञान आहे जे प्रो बायोकिक प्रक्रियेद्वारे सूक्ष्म पोषक तत्त्वांचा प्रसार करते. ॲग्झॉन ॲग्रोने या वर्षीचा सीआयआय- इंडस्ट्रियल इनोव्हेशन ॲवॉर्ड २०१८ पटकावला आहे. ॲग्झॉन ॲग्रोचे सहसंस्थापक आणि चीफ कमर्शियल ऑफिसर विशल रतन यांनी ३ डिसेंबर २०१८ रोजी दिल्ली येथील इंडिया हॅबिटॅट सेंटर येथे पुरस्कार स्वीकारला.

ॲग्झॉन ॲग्रोने नेहमीच नवीन तंत्रज्ञानाद्वारे शेतकऱ्यांच्या उत्कृष्टतेसाठी काम केले आहे. महिंद्रा ॲन्ड महिंद्रा लि., अपोलो टेले हेल्थ सर्व्हिसेस प्रा. लि. डेल्ही इंटरनॅशनल एअरपोर्ट लि. डीओडब्ल्यू, हिंदुस्थान पेट्रोलियम लि. सिमेंस (Siemens) लि., झेडक्स (Zydex) इंडस्ट्रीज यांनी पण हा पुरस्कार स्वीकारला.

# अन्न प्रक्रियेतून दुप्पट उत्पन्नाची कोणतीही योजना नाही : ज्योती

**पुणे (प्रतिनिधी):** पंतप्रधान नरेंद्र मोदी, अर्थमंत्री अरुण जेटली, कृषिमंत्री राधामोहनसिंह यांच्यासह अनेक मंत्री केंद्र सरकार २०२२ पर्यंत शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करणार असल्याचे वारंवार सांगत आहेत. परंतु केंद्रीय अन्न प्रक्रिया उद्योग राज्यमंत्री साध्वी निरंजन ज्योती यांनी याला काहीसे छेद देणारे लेखी उत्तर संसदेत दिले आहे. अन्न प्रक्रिया उद्योगाच्या माध्यमातून शेतकऱ्यांचं उत्पन्न दुप्पट करण्याची सरकारची कोणतीही योजना नसल्याचे त्यांनी संसदेत सांगितले.

संसदेत खासदार आर. पार्थिपन आणि खासदार जे. एस. जॉर्ज यांनी अतारांकित प्रश्न विचारले होते. सरकार अन्न प्रक्रिया उद्योगाच्या माध्यमातून शेतकऱ्यांचं उत्पन्न दुप्पट करण्याची योजना बनवत आहे का? असेल तर या योजनेची सद्यःस्थिती काय आहे? अन्न प्रक्रियेची सुविधा नसल्यामुळे भाजीपाला आणि फळांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते, याची जाणीव सरकारला आहे का? असे प्रश्न त्यांनी विचारले होते. त्यावर मंत्री ज्योती यांनी १८ डिसेंबर रोजी लेखी उत्तर दिले. ‘‘अन्न प्रक्रिया उद्योगाच्या माध्यमातून शेतकऱ्यांचं उत्पन्न दुप्पट करण्याची कोणतीही योजना सरकार तयार करत नाही. परंतु अन्न प्रक्रिया उद्योगाला प्रोत्साहन देण्यासाठी आणि या क्षेत्राचा विकास करण्यासाठी पंतप्रधान कृषी संपदा योजना राबवली जात आहे,’’ असे उत्तरात म्हटले आहे. मंत्र्यांचे हे उत्तर तांत्रिकदृष्ट्या योग्य असले तरी सरकार २०२२ पर्यंत शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करणार असल्याच्या संकल्पाला खो बसला असल्याचे यातून आडवळणाने मान्य करण्यात आले आहे, असे मत तज्ज्ञांनी व्यक्त केले. अन्न प्रक्रिया क्षेत्रात सुरू असलेल्या योजनांच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या दुप्पट उत्पन्नाचा संकल्प पूर्ण होण्यास मदत होणार का, यावर मंत्र्यांनी मौन बाळगले आहे, याकडे या तज्ज्ञांनी लक्ष वेधले.

